# सुवासिक अभिष्टचिंतन

Created By SHREE-LIPI Caligrafer App






कुंद
'तिन्हीसांजेला उमलेल्या चांदण्याची शीतलता'
'आणि जोडीला मंद सुगंध',
'असा दुग्धशर्करा योग म्हणजे मूर्तिमंत तू ..
Created By SHREE-LIPI Caligrafer App





जुई
वेलीवर आलेलं सुंदर स्वप्नं, जे भुईच्या कुशीत शिरून
"ओंजळी तून गजऱ्याच रूप घेऊन"
"इतरांना सुगंध आणि स्वतःला सुस्वरूप करणार "अस्तित्व" "!





गुलाब
काटेरी विश्वाला पडलेलं ,
सुगंधी आणि तेजस स्वप्नं !
Created By SHREE-LIPI Caligrafer App





अबोली
"'गंधहिन'' तरीही अस्तित्वाला महत्त्व
असलेली आणि अनेकतही उठून दिसणारी ;
"ती तूच ग आमची अबोली
Created By SHREE-LIPI Caligrafer App




निशिगंध
गुलछडी आणि रजनीगंधा सुद्धा ज्याला म्हणतात ,
रंग अगदी साधा तरीही कोणत्याही प्रसंगी
उठून दिसणारं प्रसन्न व्यक्तितत्व
Created By SHREE-LIPI Caligrafer App




मोगरा
लहानग्यांसाठी अवखळ,
तारुण्यासाठी वेड ; आणि वयास्कांसाठी
एक सुंदर ''आठवण'' !
तो मोगऱ्याचा गजरा तू .




रातराणी
'सुंदर रात्रीला पडलेलं एक
सुगंधी सुरेल स्वप्नं' !
Created By SHREE-LIPI Caligrafer App



"मोहाचं* फुल (महुवा)"
"जितकं मोहक "आणि गोड तितकंच"
"सिळवण्यासाठी दुर्धर" !

Created By SHREE-LIPI Caligrafe App




'झेंडू'
'शुभाला अजूनही शुभंकर रूप देणारी' !
Created By SHREE-LIPI Caligrafer App


'झेंडू'
'झेंडू प्रमाणे उत्सवाला' ;
'उत्साह आणि पावित्र्य देणार व्यक्तिमत्व'!
Created By SHREE-LIPI Caligrafer App



# प्राजक्त

अप्राप्य अप्सरेसारखं*,
खूप कोमल, अन् रंजक !


Created By SHREE-LIPI Caligrafer App





जास्वंद
जिच्याविना भक्ती अपूर्ण,
अशी आमची अनेक रंगी जास्वंद !
Created By SHREE-LIPI Caligrafer App






सुरंगी
अस्तित्वाची मोहिनी ......
Created By SHREE-LIPI
Caligrafer App


25/06/2019 11:02:33 AM


कमळ
प्रतिकूल परिस्थितीमध्ये सुध्दा
अतिशय कोमल, ठाम आणि सुंदर !
Created By SHREE-LIPI Caligrafer App




गुलबक्षी
काही घटिकांचा सहवास पण अनेक रंगी आणि अनेक छटा
आणि सगळ्या तितक्याच लाघवी!
Created By SHREE-LIPI Caligrafer App




# लटक चमेली ( इंडियन कॉर्क )

असा काही सुंदर सडा जिथे थोडा वेळ मन लहान होऊन
वेणी ( गजरा ) करायचा मोह आवरत नाही ...
तसाच, तुझाही सहवास थोडा वेळ लहान मूल होऊन

## हट्ट करायला लावणारा !


Created By SHREE-LIPI Caligrafer App





"शेवंती"
'हारामध्ये ओवल तर, अर्पण भाव आणि वेणीत'
"ओवलं तर, सौंदर्याचा आविष्कार"!! ...
"तसच तुझं आलेल्या प्रत्येक क्षणात समरस होणं"!
Created By SHREE-LIPI Caligrafer App




देवचाफा
तसतर याच असणं देवळाजवळ फार मनमोहक वाटतं ,
आणि कोरड्या कातळावर तळपत्या उन्हात फुलताना पहिला ;
की जगण्याची उमेद वाढवतं ...
तस तुझ असणं जगण्याची उमेद देणारं !
Created By SHREE-LIPI Caligrafer App




'नागचाफा'
'पाचच पाकळ्या असल्या तरी मध्यभागी नागकेसराच्या'
'अस्तित्याने विशेष सुगंध प्राप्त होतो'...
'तशी तू आमची सगळ्यांची ''नागकेशर'' !




शिवलिंगी ( कॅनन बॉल फ्लॉवर )
खरोखरच शिवाचं अस्तित्व ज्यात दिसतं ;
तसच तुझ्यात शक्तीचं
( देवस्वरुप आईचं ) दर्शन घडतं .
Created By SHREE-LIPI Caligrafer App




"कृष्णकमळ"

'लहानपणी महाभारत आहे ह्या फुलात'

'अस सांगायचे ते असं' ;

१०० 'कौरव म्हणजे १०० पाकळ्या' ,

५ 'परागकण म्हणजे पाच पांडव'

'आणि मध्ये कृष्ण तीन तुरे असलेलं'


... 'तसच तू आमच्यासाठी असलेली'

"'कृष्णकमळ" सगळ्या भावंडांना


'एकत्र बांधून ठेवणारी'!

Created By SHREE-LIPI Caligrafer App





मधुमालती
सकाळी पांढरं, थोडी उन्हं वर आल्यावर
हलकी गुलाबी आणि संध्याकाळी गडद
तश्या अनेक छटा आहेत तुझ्या
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर!...
Created By SHREE-LIPI Caligrafer App





मधुगामिनी
"मोहक पांढरं छोटंसं फूल",
'थोडासा आंबट सुवास तरीही गोड',
"तस तुझं दिसणं आणि असणं"
" 'थोडं खट्ट थोडं मिट्ठास' "
Created By SHREE-LIPI Caligrafer App




'खुरी'
'जंगली असुनही '' सुवासाने '' स्वतःकडे'
'यायला लावणारी छोटीशी फुलं' ....
'तस तुझ आम्हाला तू',
'तुझ्या गोड हाकेने तुझ्याकडे यायला लावणं'!
Created By SHREE-LIPI Caligrafer App




चमेली
नावाप्रमाणे नखरेल पण स्वतःच्या सुवासाने
“स्वतंत्र अस्तित्व” बाळगून असणारी “तू” !
Created By SHREE-LIPI Caligrafer App



# कण्हेर

हीचे रंग अनेक , काठ पदराच्या साडीचा काठ जसा

ठसठशीत असला की साडी छान दिसते


## तशी कण्हेरीची किनार ...

तशी ती सुंदर साडी किनार म्हणजे तू

Created By SHREE-LIPI Caligrafer App




'तगर'
"साधारणतः पांढर फुल, पण स्वस्तिकाच्या"
"आकराचं असल्याने पूजेत असल्यावर प्रसन्नता देतं";
'तसच तुझं अगदी साधी असूनही एक'
'स्वस्तिकाकृती वेगळेपण ल्यायलेली तू तगर' !!
Created By SHREE-LIPI Caligrafer App





कर्दळ
दत्तगुरु दत्तात्रेय यांची सदैव स्मरण करून
देणारी अशी निर्गुण निराकार ,
सात्विक सहजीवनाची साक्ष्य !
Created By SHREE-LIPI Caligrafer App



नागद्रोण ( ओळखीचं नाव लीली )
तिच्याशिवाय हाराला शोभाच नाही ..
तशी तुझ्याशिवाय कुटुंब पूर्ण नाही !

Created By SHREE-LIPI Caligrafer App




सोनटक्का
कोंकणच्या घराचं परसदार यानेचं परिपूर्ण दिसत ,
तस तुझं हे आनंदानी भरलेलं कुटुंब तुझ्यामुळेच परिपूर्ण आहे !
Created By SHREE-LIPI Caligrafer App



'कर्ण'

'सर्वसामान्य पिवळ्या रंगात निसर्गाच्या हिरव्या शालुवर'

'बुट्टे दार नक्षी करण्याचा मान मिळालेलं फुल' ,

'तशी सामान्य घरालाही बादशाही थाटाचा'

'महाल बनवलेली तू' !

Created By SHREE-L Caligrafer App





पळस (पालाश)
कडकडीत उन्हाळ्यात ह्या फुलांच
असणं कसं डोळ्यांच पारणं फेडतं;
तसच खूप थकलेलं असताना
तुझ समोर येणं असतं !
Created By SHREE-LIPI Caligrafer App





शंकासुर
नाजूक फुलं आणि लांब परागकण असं असणं
त्याच्या स्वत:मध्ये असण्याचं वैशिष्ट्य जे तुझ्याठायी आहे.
Created By SHREE-LIPI Caligrafer App


24 12 2006


कोरांटी
'रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा'...
'खूप रंग आहेत याचे पण या सम हेच'...
Created By SHREE-LIPI Caligrafer App




गुलमोहोर
एक लांबच्या प्रवासातला
मूक साथीदार असावा असं ..
Created By SHREE-LIPI
Caligrafer
App



# तेरडा

## पाठवणीच्या वेळी आईने मुलीला दिलेला

'सूचक मार्गदर्शक संदेश. जसे तू आम्हाला वेळोवेळी देतेस'!
( 'तो सूचक संदेश म्हणजे " आनंदात षष्ठीला घरी ये' -
'सप्तमीला गोडाधोडाचा पाहुणचार घे' -
'आणि अष्टमीला सासरी जाऊन त्यांचं घर फुलवत रहा' ")

Created By SHREE-LIPI Caligrafer App



# लाजाळू च फुल :

'खरतर या फुळकडे फुल'
'म्हणून कुतुलहने कुणीही जात'
'नाही ... म्हणूनच की'
'काय फुलपाखरं या फुलांवर'
'रुंजी घालतात ...कारण तिथे'
'त्यांना कुणी पकडायला जात'
'नाही ... तशी तू'
'आमची लाजाळूच्च'' फुल''


Created By SHREE-LIPI Caligrafer App




# दयाळ

पावसाळ्यात येणारं, कोकणातल्या
बेछूट पावसाळा झेलून सुधा कधीही
ताजं तवान असलेलं ,
तशी तू प्रसंगावधानी तरीही कोमल !

Created By SHREE-LIPI Caligrafer App




ब्रह्मकमळ
याचं फुलणं ज्याला कळेलं तो शिवप्रत पोहोचतो ...
तसं तुझं हसणं ज्याला कळेलं तो ........
Created By SHREE-LIPI Caligrafer App



# "कुसर"

"आंबे , फणस , जांभूळ यांच्या उपस्थितीतही"
"स्वतःकडे येण्याचा मोह घालणारी कुसर",
"मंद सुगंध आणि वेलीवर असणं हेच एवढं मोहक" ;
"तशी तू आमची कुसर".....

Created By SHREE-LIPI Caligrafer App



‘सीता अशोक’

‘सीतेने ज्या झाडाला आपलंसं करून विरह दूर केला

ती तू आमची सीता अशोक’.

(‘थोडक्यात अर्थ अशोक = अ शोक’ =


‘ज्याच्या जवळ शोक नाही असा जो तो

किंवा ज्याच्यामुळे शोकाचा विसर

पडतो असा तो’ )

Created By SHREE-LIPI Caligrafer App




गोकर्ण
अस्मानी रंगाचं , नाजूक ठेवणीचं आणि
वेलीवर बुट्टेदार फुलांची नक्षी साकारलेलं ...
तुझ असणं असच वेलबुट्टी सारखं ,
आखीव रेखीव ...
Created By SHREE-LIPI Caligrafer App



# "अनंत"


"विष्णू ला प्रिय अस हे शुभ्र रंगात असूनही"

'सुवासाने रंगाची उधळण करणार'....

तुझ्यातला तुला शोधणारं !

Created By SHREE-LIPI Caligrafer App




'सूर्यफूल'
'तेजाचा मागोवा घेणारा'
'स्निग्धतेचा तेजःपुंज' ...!
Created By SHREE-LIPI Caligrafer App



# 'सदाफुली'

'तस खूपच साधं पण रोज येणारं आणि'
'कोणत्याही वातावरणात समरसून जाणारं'.
'अस तुझ लीलया वावरण'!!

Created By SHREE-LIPI Caligrafer App



# ताम्हण

‘पाण्याच्या निश्चित स्त्रोतांची जाणीव करून देणार महाराष्ट्राचं भूषण’;
‘तस जावकर– वेंगुर्लेकर घराचं भूषण तू’!

Created By SHREE-LIPI Caligrafer App




'बोगनवेल'
"काटेरी वैभव लाभलेलं लोभस रूप"...
'स्तब्ध आणि स्तिमित होऊन पाहायला लावणारं'...
'जसं तुझ्यात सगळ्यांना स्तिमित करायचं सामर्थ्य आहे'!
Created By SHREE-LIPI Caligrafer App




# कवठीचाफा

कायम पाकळ्या बंद असणार पण
सुवसाची उधळण करणारं फुल,
जसं तुझ घराच्या कोंदणात राहूनही
''स्वत:च स्वत्व'' जपण !

Created By SHREE-LIPI Caligrafer App




केशर
हिमालयाच्या शुभ्र बर्फाच्छादित गालीच्यावरचं एक सुबक ,छोट्या झुडूपावरचं एक
नाजूक फूल, ज्याचे परागकण ३ च असतात ;
पण कोणत्याही गोड पदार्थाची रंग आणि चव बदलण्याचं सामर्थ्य असतं
तशीच तुझी मोजक्या आणि नेमक्या शब्दातली समज देणं !
Created By SHREE-LIPI Caligrafer App


alamy stock photo
FFM89G
www.alamy.com


बकुळ
सुकुनही स्वतःची ओळख जपणारी !
Created By SHREE-LIPI Caligrafer App




रुई ( मांदाराचं फूल )
"श्रावणात शिवाला ज्याच्या हाराने शीतलता देतात" ..
तशी आमची प्रत्येक क्षणाची शीतल स्पर्श देणारी सावली !
Created By SHREE-LIPI Caligrafer App



# मदनबाण

"अविस्मरीय सुगंधाची दैवी देणगी जी एका घराण्याने"

'एका घराण्याकडे सुपूर्त केली'..

सासुराला सुगंधित करणारी अशी तू !

Created By SHREE-LIPI Caligrafer App



# जाई

## बाळाला जोजवताना ;

'तिच्या गर्द असण्याचीआणि सुगंधी'
'आईच्या घट्ट मिठीची आस लावणारी'!

Created By SHREE-LIPI Caligrafer App




केवडा
हे फुल म्हणावं की सुगंधी पान !?
ज्याच्या सुगंधा शिवाय
बिर्याणीची मजाच नाही अशी तू..
तुझ्या असण्याशिवाय आप्तस्वकीय
भेटीला गोडवा नाही !
Created By SHREE-LIPI Caligrafer App




सोनचापा
नाकाला ज्याची उपमा मिळते
आणि ज्याच असणं नाकाला लवकर कळतं..
अशी आमची चाफेकळी!
Created By SHREE-LIPI Caligrafer App



# 'अग्निशिखा'

'जनसामान्य जीला गौरी गणपतीच्या वेळी'
'गौरीच्या हाताच स्थान देतात';
-अशी माहेवाशीण गौर तू !!

Created By SHREE-LIPI Caligrafer App




कारवी
जिच्या फुलण्यासाठी निसर्ग आणि
निसर्गप्रेमी ८ वर्ष वाट पाहतात ;
तशीच आम्ही भाचेमंडळी तुझ्या
येण्याची वाट क्षणोक्षणी पाहतो !!
Created By SHREE-LIPI Caligrafer App



‘सीतेची वेणी ( फॉक्स टेल’ )
‘हा नैसर्गिक गजरा जी झाडं माळतात’ ,
‘तिची शोभा अतुलनीय’ ;
‘तसं तुला माळलेल्या तुझ्या कुटुंबाची शोभा अतुलनीय’ !

Created By SHREE-LIPI Caligrafer App




बहावा
पाऊस आता १५ दिवसात येणारच अशी
शाश्वती असणार फुल ;
तशी तुझ्यासोबत आनंद आणि उत्साह
येणारच याची शाश्वती आम्हाला आहे !
Created By SHREE-LIPI Caligrafer App



# गणेशवेल

शुभ्र चांदण्या सगळेच पाहतात ,

पण निसर्गाने आरक्त चांदण्या दिल्या ते


सूर्यपक्षाला त्याची भूक शमविण्याचा इशारा देण्यासाठी ;

जशी तू आमची स्नेहाची भूक शामावणारी

आरक्त चांदणी !

Created By SHREE-LIPI Caligrafer App




मारवा
"अंगाअंगी मी रंग खेळते , केसामधी मारवा",
"पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा" !!.....
"आमचा सुगंधी , टवटवीत मारवा तू" !
Created By SHREE-LIPI Caligrafer App